**आजचा सुविचार**

काळा रंग हा अशुभ समजला जातो.

पण प्रत्येक काळा रंगाचा

फळा हा अनेक विद्यार्थांचे

आयुष्य उजलवत असतो...

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २२७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.३० मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पुणे विमानतळावर २६.८० कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने ड्रग्ज तस्करीचा एक मोठा डाव उधळून लावला आहे. थायलंडहून चक्क 'मँडरिन ऑरेंज'च्या बॉक्समध्ये लपवून आणलेला तब्बल ७६ किलो 'हायड्रोपोनिक गांजा' जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारात याची किंमत २६.८० कोटी रुपये असून, अत्यंत चलाखीने व्हॅक्यूम सीलबंद पाकिटांत हे ड्रग्ज दडवले होते. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून तस्करीचे आंतरराष्ट्रीय रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

असा आखला प्लान

ही संपूर्ण खेळी अगदी स्मार्ट पद्धतीने आखली गेली होती. माल संत्र्याच्या फोडी (मँडरिन ऑरेंज) असल्याचं सांगून थर्माकोलच्या बॉक्समध्ये पॅक करून आणण्यात आला होता. बाहेरून सगळं अगदी नॉर्मल दिसत होतं, त्यामुळे सुरुवातीला कोणालाही संशय येणं कठीण होतं. पण स्कॅनिंग करताना अधिकाऱ्यांना काहीतरी गडबड असल्याचा अंदाज आला.

**गांजा असल्याचं समोर आलं**

यानंतर त्यांनी एक बॉक्स उघडून पाहिला आणि खरी गोष्ट समोर आली. आत सीलबंद टिनचे डबे ठेवलेले होते. सुरुवातीला त्या डब्यांमध्ये पांढऱ्या रंगाची पावडर दिसत होती. मात्र, नीट तपासणी केल्यानंतर लक्षात आलं की ही पावडर फक्त वरवरची होती. त्या पावडरच्या आत व्हॅक्यूम सीलबंद प्लास्टिक पॅकेट्समध्ये गांजा लपवून ठेवण्यात आला होता.

**किंमत २६.८० कोटी**

यानंतर सगळे बॉक्स तपासले असता एकूण ७६.५८ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारात या मालाची किंमत जवळपास २६.८० कोटी रुपये असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.




**एका आरोपीला अटक**

या प्रकरणी सीमाशुल्क विभागाने तातडीने कारवाई करत एका आरोपीला अटक केली आहे. हा माल नेमका कोणासाठी आणला जात होता, आणि यामागे कोणतं मोठं रॅकेट आहे का, याचा आता सखोल तपास सुरू आहे.

एकंदरीत पाहता, खाद्यपदार्थ नावाखाली मोठ्या प्रमाणात ड्रग्ज तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे हा डाव पूर्णपणे उधळला गेला. त्यामुळे पुन्हा एकदा विमानतळावरील सुरक्षा यंत्रणा किती सतर्क आहे, हे समोर आलं आहे.

## उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनीही काळजी घेण्याचे आवाहन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** गत पंधरवड्यापासून जिल्ह्यात दैनंदिन तापमानात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचा परिणाम थेट मानवी शरीरावर होत असून योग्य काळजी घेतली नाही तर उन्हाच्या तिव्रतेमुळे कधीकधी मृत्युही होऊ शकतो. त्यामुळे उष्माघात नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

नागरिकांनीसुध्दा उन्हापासून संरक्षणासाठी योग्य दक्षता घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी (दि. २८) उष्माघात नियंत्रण कृती आराखडाबाबत आयोजित बैठकीत डॉ. वुईके बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, महावितरणच्या अधीक्षक अभियंता संध्या चिवंडे आदी उपस्थित होते. उष्माघाताबाबत नागरिकांमध्ये विविध माध्यमातून जनजागृती करणे आवश्यक आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, उष्माघाताची लक्षणे, घ्यावयाची काळजी, काय करावे, काय करू नये आदी बाबी नागरिकांपर्यंत पोहचल्या पाहिजे. उष्माघाताबाबत संपर्क करायचा असल्यास जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक व उष्माघात संपर्क अधिकाऱ्यांची यादी सुद्धा नागरिकांपर्यंत पोहचवा.

जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांसाठी राखीव खाटा, रेफरल साठी रुग्णवाहिकेची उपलब्धता, कुलरसह थंड खोलीची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ओआरएस व औषधीसाठा उपलब्ध ठेवावा, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. उष्णतेची लाट जागतिक हवामान संघटनेनुसार सलग पाच दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस दररोज कमाल तापमान, सरासरी कमाल तापमानापेक्षा ५ अंश सेल्सिअसने जास्त असते, तेव्हा त्याला उष्णतेची लाट म्हणतात. मैदानी भागात तापमान किमान ४० अंश किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर उष्णतेची लाट मानली जाते.



**उष्णतेच्या लाटेसंबंधी आजाराची लक्षणे :**

१) चक्कर येऊन पडणे, २) फेफरे किंवा झटके येणे, ३) झोपेतून उठण्यास त्रास होणे / उठता न येणे, ४) गोंधळल्यासारखे बोलणे / वागणे, ५) श्वासाची व हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, ६) शरीराचे तापमान १०५ अंश फॅरनहिट (४०.५ अंश सेल्सिअस) पेक्षा अधिक होणे, ७) स्नायुत पेटके येणे, ८) चिडचीड होणे, ९) डोकेदुखी, अशक्तपणा येणे, १०) मळमळ व उलटी होणे, अधिक घाम येणे.

**काय करावे ?**

१) शरीरातील पाण्याची पातळी योग्य राखण्यासाठी भरपूर पाणी पिणे, २) डोक्यावर टोपी, रुमाल, टॉवेल किंवा छत्री वापरावी, ३) उन्हात बाहेर जातांना डोळ्यावर गॉगल्स लावावा, ४) कष्टाची कामे सकाळी किंवा संध्याकाळी कमी तापमानात करावी.

**काय करू नये...**

दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर उन्हात जाणे टाळावे, २) उन्हात अतिकष्टाची कामे करू नये, ३) दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेय घेऊ नये, ४) गडद घट्ट व जाड कपडे घालणे टाळावे, ५) उच्च प्रथिनयुक्त व शिळे अन्न खावू नये. येथे करा संपर्क उष्माघाताबाबत संपर्क करावयाचा असल्यास जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर कॉल सेंटर दूरध्वनी क्रमांक ०७१७२ – २५०४००

## अशोक खरातचे ३०० व्हिडीओ पोलिसांच्या हाती, भोंदू बाबाची संपूर्ण 'कुंडली' बाहेर येणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी आता महत्त्वाची माहिती समोर येत आहे. अशोक खरात प्रकरणात रोज नवनवी माहिती समोर येत आहे. अनेक पीडित महिला त्याच्या विरोधात तक्रार करण्यासाठी आता पुढे येत आहेत. या प्रकरणी पोलीस आता सखोल तपास करणार आहेत. खरातच्या संपत्तीपासून ते वेगवेगळ्या अँगलने आता तपास होणार आहे. IPS तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वातील SIT या प्रकरणी सखोल तपास करत आहे. एसआयटीकडून या प्रकरणी महत्त्वाचा पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

एसआयटीने आयकर विभाग, मुद्रांक शुल्क नोंदणी विभाग आणि पासपोर्ट विभागासोबत पत्र व्यवहार केला आहे. अशोक खरातची संपत्ती, मालमत्ता, आर्थिक व्यवहार तपासण्यासाठी हे पत्र पाठवण्यात



आलं आहे. अशोक खरातच्या मालमत्तांच्या चौकशीसाठी मुद्रांक शुल्क नोंदणी विभागाला पत्र पाठवण्यात आलं आहे. अशोक खरातच्या परदेश दौऱ्यांच्या माहितीसाठी पासपोर्ट विभागाला देखील पत्र पाठवलं आहे. एसआयटीने या तीनही विभागांना पत्र पाठवून माहिती मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

भोंदू अशोक खरातचे आक्षेपार्ह व्हिडीओ २०२४ मधील असल्याची माहिती मिळत आहे. संबंधित व्हिडीओ हे दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीतील असल्याची शक्यता आहे. ओकस प्रॉपर्टी हेच सर्व काळे कर्माचे केंद्र असल्याचे देखील तपासात समोर आले आहे. अशोक खरातचे ३०० पेक्षा जास्त व्हिडीओ एसआयटीच्या हाती लागले असल्याची माहिती मिळत आहे.

**खरातला पुन्हा कोर्टात आणलं**

अशोक खरात याला आज जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने खरात याच्या पोलीस कोठडीत १ एप्रिलपर्यंत ३ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने पोलिसांना अधिक तपासासाठी खरातच्या कोठडीची मागणी केली. सुनावणी दरम्यान सरकारी वकील आणि पोलिसांनी भक्कमपणे बाजू मांडली. आरोपी अशोक खरात तपासात सहकार्य करत नाही, त्याच्याकडे मोठी मालमत्ता आहे. या गुन्ह्यामध्ये खरात याचे नेमके कोण कोण साथीदार आहेत, आणि जप्त केलेल्या मोबाईलमधील माहितीचा तांत्रिक तपास बाकी आहे, अशी बाजू सरकारी वकिलांनी कोर्टात मांडली.

तक्रारदार महिलांना खरात जे पाणी प्यायला देत होता, त्याबाबत देखील पोलिसांना संशय आहे, त्या पाण्यामध्ये गुंगीकारक द्रव्य होते का? याचा तपास होणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. तसेच या प्रकरणाचे धागेदोरे लांबपर्यंत पसरले असू शकतात. पोलीस या प्रकरणात आता खरातच्या घराच्या मालमत्तेची सखोल माहिती मिळवणार आहेत. तसेच पोलीस त्याच्या संपर्कातील इतर संशयितांचीही चौकशी करणार आहेत. या वाढीव कोठडीमुळे आता पोलिसांच्या हाती नेमके काय पुरावे लागतात आणि या रॅकेटमध्ये अजून कोणाची नावे समोर येतात? याकडे संपूर्ण जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागून आहे.

## रेल्वेकडून खान्देशाला मोठं गिफ्ट!
## दादर-भुसावळ एक्स्प्रेस कायमस्वरूपी धावणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** खान्देशातील प्रवाशांसाठी आनंदवार्ता ठरणारा महत्त्वपूर्ण निर्णय पश्चिम रेल्वेकडून घेण्यात आला आहे. दादर-भुसावळ त्रिसाप्ताहिक विशेष गाडीला आता कायमस्वरूपी दर्जा देण्यात आला आहे. विशेष गाडी म्हणून सुरू असलेली ही सेवा आता नव्या क्रमांकासह (१९०४७/४८) नियमित गाडी म्हणून धावणार असल्याची माहिती जळगावच्या भाजप खासदार स्मिता वाघ यांनी दिली आहे. आतापर्यंत ही गाडी वेळोवेळी मुदतवाढ देत चालवली जात होती. मात्र, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील प्रवाशांचा वाढता प्रतिसाद आणि सातत्यपूर्ण मागणी लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे 'स्पेशल' म्हणून ओळखली जाणारी ही गाडी आता कायमची ट्रॅकवर राहणार आहे.




या निर्णयामुळे प्रवाशांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे. गाडी नियमित सेवेत आल्यानंतर तिकीट दरात सुमारे २० ते २५ टक्क्यांपर्यंत कपात होऊ शकते. यामुळे नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णांसाठी प्रवास अधिक किफायतशीर आणि सुलभ होणार आहे.

ही गाडी आठवड्यातून तीन दिवस म्हणजेच सोमवार, बुधवार आणि शनिवारी धावणार आहे. तसेच या निर्णयामुळे मुंबई (दादर) ते भुसावळ दरम्यानची कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे. खान्देशातील नागरिकांसाठी मुंबईत नोकरी, शिक्षण आणि व्यवसायासाठी ये-जा करणे यामुळे अधिक सोपे होणार आहे.

**खान्देशवासीयांकडून रेल्वे मंत्र्यांचे आभार**

रेल्वे प्रशासनाने प्रवासी संख्या, मागणी आणि उपलब्ध सुविधा यांचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. भविष्यात या गाडीच्या फेऱ्या वाढवण्याचाही विचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे. या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. या निर्णयाने खान्देशवासीयांकडून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार व्यक्त केले जात आहेत. खासदार स्मिता वाघ यांनीही खान्देशवासीयांच्या दीर्घकालीन मागणीला न्याय मिळाल्याचे सांगत सम ाधान व्यक्त केले आहे. दादर-भुसावळ एक्स्प्रेसला कायमस्वरूपी दर्जा मिळाल्याने खान्देशातील रेल्वे कनेक्टिव्हिटीला नवी गती मिळणार असून प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि किफायतशीर होणार आहे.

## उपराजधानीतून १४ शहरांसाठी विमानसेवा, आता थेट नांदेडला पोहोचता येणार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नागपूर :** उपराजधानीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आगामी उन्हाळा सुखकर होणार आहे. विमानतळ प्रशासनाने आज, रविवारपासून लागू होणारे नवीन उन्हाळी वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्ये एकूण १४ शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, आता नागपूरकरांना नांदेडसाठी थेट विमानसेवा उपलब्ध होणार आहे.



**उड्डाणांची संख्या वाढली....**

विमानसेवांचे उन्हाळी वेळापत्रक २९ मार्च रोजी सुरू होऊन २४ ऑक्टोबरपर्यंत प्रभावी राहणार आहे. नव्या वेळापत्रकानुसार नागपूर-नांदेड या नवीन सेक्टरची भर पडल्याने एकूण गंतव्यस्थानांची संख्या तेरावरून चौदा झाली आहे. विमानतळावरून आता दर आठवड्याला एकूण ४८६ विमानांची ये-जा होणार आहे. मागील हिवाळी वेळापत्रकाच्या (४७८ फेऱ्या) तुलनेत यामध्ये आठ फेऱ्यांची वाढ झाली आहे. विमानतळावर दररोज सरासरी ७० विमान फेऱ्या (३५ आगमन आणि ३५ प्रस्थान) होतील.

नागपूर विमानतळावरून सध्या ६ प्रमुख विमान कंपन्या आपली सेवा देताहेत. यामध्ये इंडिगो, एअर इंडिया, स्टार एअर, एअर अरेबिया, कतार एअरवेज, एअर इंडिया एक्सप्रेस यांचा समावेश आहे. प्रवाशांना नागपूरहून मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद, इंदूर, कोलकाता, गोवा यांसारख्या प्रमुख शहरांसह किशनगड आणि नवी मुंबईसाठीही विमानसेवा मिळेल. तसेच, दोहा आणि शारजाह या दोन आंतरराष्ट्रीय शहरांसाठीही थेट उड्डाणे सुरू राहणार आहेत. विमान फेऱ्यांमध्ये झालेली वाढ आणि नांदेडसारख्या नवीन शहराची जोड यामुळे व्यापार आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

**शेड्यूल असे...**

'उडान'योजनेअंतर्गत नागपूर-नांदेड ही विमानसेवा ३१ मार्चपासून स्टार एअरकडून चालविण्यात येणार आहे. या सेवेमुळे नागपूरकरांसह नांदेड येथील तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाऱ्याला भेट देणाऱ्या शीख भाविकांना म ोठा दिलासा मिळणार आहे. स्टार एअरकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, आठवड्यातील शुक्रवार वगळता इतर सर्व दिवशी ही सेवा उपलब्ध राहणार आहे. नांदेडहून नागपूरकडे येणारे विमान सकाळी ११.२० वाजता उड्डाण घेऊन दुपारी १२.२० वाजता नागपूर येथे पोहोचेल. त्यानंतर नागपूरहून नांदेडकडे जाणारे विमान दुपारी १२.५० वाजता उड्डाण घेऊन दुपारी १.३० वाजता नांदेड येथे दाखल होईल. या मार्गावर ८८ आसनक्षमतेचे केवळ इकॉनॉमी वर्ग असलेले विमान वापरण्यात येणार आहे.

# थोडक्यात

## जिल्ह्यासाठी 'ऑरेंज' व 'येलो' अलर्ट; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२९, अहिल्यानगर :** भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यात दि. ३० व ३१ मार्च, २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळे, सोसाट्याचा वारा व गारपीटीची शक्यता व्यक्त केली असून जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तसेच दि. १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस व वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.मेघगर्जना, वीजा चमकणे किंवा वादळी वारे असताना झाडाखाली उभे राहू नये; सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळाच्या वेळी कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये व विद्युतवाहक वस्तूंपासून दूर राहावे.मोकळे मैदान, टॉवर्स, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर, धातूचे कुंपण यांजवळ थांबू नये. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) परिसरात थांबणे टाळावे. वीजा चमकत असताना उघड्यावर असल्यास गुडघ्यावर बसून शरीराचा जमिनीशी संपर्क कमी ठेवावा.धरण, नदी किंवा कालव्यांच्या पाण्यात उतरू नये; धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे.शेतकऱ्यांनी पाऊस व गारपीट लक्षात घेऊन शेतीमालाचे संरक्षण व साठवणूक करावी.बाजार समितीत आणलेला माल सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी.जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे. नागरिकांनी वादळी वारे, वीज, पाऊस व गारपीट यापासून स्वतः चे व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस स्टेशन किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१-२३२३८४४ अथवा २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला जलद सेवा द्या - पोलीस अधीक्षक डॉ.राठोड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, पैठण (छ.संभाजीनगर) :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी नुकतीच पैठण पोलीस ठाण्याला भेट देऊन वार्षिक तपासणी केली. यावेळी त्यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्याशी संवाद साधताना दैनंदिन कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला, जेणेकरून जनतेला अधिक जलद आणि पारदर्शक सेवा उपलब्ध होईल.

वार्षिक तपासणी आणि मार्गदर्शन पोलीस अधीक्षक डॉ.राठोड यांनी आपल्या दौऱ्यादरम्यान पैठण पोलीस ठाण्यातील अभिलेख (रेकॉर्ड), मुद्देमाल कक्ष आणि शस्त्रागाराची सखोल तपासणी केली. तसेच पोलीस ठाणे परिसरातील स्वच्छतेची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या तपासणीनंतर त्यांनी आयोजित केलेल्या पोलीस पाटील, पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या 'वृंद परिषद' (दरबार) मध्ये मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ.राठोड म्हणाले की, आजच्या काळात गुन्ह्यांचा तपास आणि प्रतिबंध करण्यासाठी तंत्रज्ञान ही महत्त्वाची गरज आहे. पोलीस अंमलदारांनी तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या कामकाजाचा दर्जा सुधारावा. जनतेच्या तक्रारींचे त्वरित निवारण करणे आणि त्यांना पोलीस ठाण्यात आल्यावर सन्मानाची वागणूक मिळणे, हे आपले प्रथम कर्तव्य आहे. या वार्षिक तपासणी प्रसंगी पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, ठाण्यातील सर्व दुय्यम अधिकारी, पोलीस अंमलदार आणि पोलीस पाटील उपस्थित होते.

## मालमत्ता कर विभागाने आत्तापर्यंत केली १५७ मालमत्तांवर अटकावणी कारवाई




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, पनवेल :** मालमत्ता कर भरण्यासाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख असून महापालिकेचा मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक राहीले आहेत. मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

दरम्यान पनवेल महानगरपालिका हद्दीतील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने धडक मोहीम सुरू केली आहे. महापालिकेची दिनांक २९ मार्च २०२६ पर्यंत एकूण मागणी २२८९.७३ कोटी रुपये इतकी असून, दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते २९ मार्च २०२६ रोजी पर्यंत एकूण वसुली ६८२.५३ कोटी व शिल्लक १६०६.३२ कोटी आहे. थकित मालमत्ता कर वसुलीसाठी मालमत्ता कर विभागाकडून धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे. वसुली वाढविण्यासाठी १३ स्वतंत्र वसुली पथके कार्यरत करण्यात आली आहेत. थकबाकीदारांना प्रत्यक्ष भेट देऊन नोटीस वितरण व जप्ती (अटकावणी) कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक २८ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आलेल्या कारवाईनुसार कामोठे, कळंबोली, खारघर, पनवेल, उपविभाग नावडे या नोडमध्ये एकूण १७१६ नोटिसा बजावण्यात आल्या असून १५७ अटकावणी कारवाया करण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या वतीने नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरल्यास २% सवलत देण्यात येत आहे. नागरिकांनी panvelmc.org`m संकेत स्थळावरून सहजपणे कर भरता येणार आहे.याशिवाय, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी KARMITRA App d Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती उपायुक्त स्वरूप खारगे यांनी दिली आहे. अटकावणीची कारवाई टाळण्यासाठी मालमत्ता कर धारकांनी वेळेत भरावा व महापालिकेच्या विकासकामांना सहकार्य करावे असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाबळेश्वरमधील नाकींदा-केट्स पॉईंट मार्ग प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पर्यटकांसह ग्रामस्थांचा जीव धोक्यात

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर (सातारा) :** महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वर तालुक्यात सध्या पर्यटनाला प्रशासकीय अनास्थेची गळती लागली आहे.

महाबळेश्वर-पाचगणी मुख्य रस्त्यापासून मौजे नाकींदा गावाकडे जाणारा आणि पुढे प्रसिद्ध 'केट्स पॉईंट'कडे जाणारा सुमारे ३ ते ४ किमीचा रस्ता सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावर पडलेले जीवघेणे खड्डे आणि पावसाच्या पाण्यामुळे झालेली दुरवस्था पाहता, हा मार्ग प्रवासासाठी नसून अपघातासाठी बनला असल्याचे चित्र दिसत आहे.

**रस्त्याची दुरवस्था आणि वाहनांचे नुकसान**

वेण्णा लेक ओलांडल्यानंतर नाकींदा बस थांब्यापासून सुरू होणारा हा रस्ता जागोजागी उखडला आहे. गेल्या काही वर्षांपासून रस्त्यावरील डांबर पूर्णपणे निघून गेले आहे. रस्त्याच्या कडेची गटारे बुजल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यावरून वाहते, ज्यामुळे रस्त्याच्या कडेला मोठ्या घळी पडल्या आहेत. यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने पर्यटक व स्थानिकांच्या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

**साईड पट्ट्या खचल्याने अपघातांची मालिका**



या मार्गावर दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या साईड पट्ट्या (Shoulders) अनेक ठिकाणी पूर्णपणे खचल्या आहेत. दोन वाहने समोरासमोर आल्यास बाजूला जाण्यासाठी जागा उरलेली नाही. अशा वेळी गाडी उताराला घासली जाते किंवा थेट खड्ड्यात कोसळते. यामुळे येथे रोज किरकोळ अपघातांची मालिका सुरू आहे.

**कायदेशीर आणि तांत्रिक पेच**

सामाजिक कार्यकर्त्यांनी या दुरवस्थेवर तांत्रिक व कायदेशीर बोट ठेवले आहे. कलम २१ (जीविताचा अधिकार) सुरक्षित रस्ते मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. खराब रस्त्यांमुळे होणारे अपघात हे प्रशासकीय निष्काळजीपणातून होणारे मानवी हक्कांचे उल्लंघन आहे.

IRC मानके : डोंगराळ भागातील रस्त्यांसाठी पक्की गटार व्यवस्था आणि मजबूत साईड पट्ट्या असणे अनिवार्य असतानाही या नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

**निधीचा प्रश्न :**

दरवर्षी पावसाळ्यानंतर रस्ते दुरुस्तीसाठी येणारा विशेष निधी नक्की कुठे खर्च झाला, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.

केट्स पॉईंटवरून वनविभागाच्या समितीला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होतो. तरीही या मार्गाच्या दर्जेदार कामाकडे दुर्लक्ष का? जर तातडीने डांबरीकरण आणि साईड पट्ट्यांचे काम झाले नाही, तर मोठा अनर्थ घडू शकतो.

**आंदोलनाचा इशारा**

केंद्र सरकारच्या ग्राम सडक योजनेतून किंवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे. सामाजिक व पर्यावरण कार्यकर्ते श्री. सूर्यकांत उर्फ बाळासो पांचाळ यांनी इशारा दिला आहे की, जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल करण्यात येईल आणि प्रसंगी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## डिलिव्हरीचा मेसेज, पण सिलिंडर गायब !

### दिव्यात गॅस वितरणात गंभीर गैरव्यवहार, मनसेने ठाणे जिल्हाधिकाऱ्याकडे केली तक्रार

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात घरगुती गॅस सिलेंडर वितरणामध्ये मोठा गैरव्यवहार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

नागरिकांनी गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर कंपनीकडून सिलेंडर डिलिव्हर झाल्याचा मेसेज येत असला, तरी प्रत्यक्षात ८ ते १० दिवस सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अनेक कुटुंबांची रोजची स्वयंपाकाची व्यवस्था विस्कळीत होत आहे.

विशेष म्हणजे, काही प्रकरणांमध्ये डिलिव्हरी बॉय किंवा संबंधित गॅस एजन्सीकडून नागरिकांना पुन्हा नवीन सिलेंडर बुक करण्यास सांगितले जात असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार सरळसरळ फसवणूक असून न दिलेले सिलेंडर काळाबाजारात विकले जात असल्याचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, देशात सध्या आंतरराष्ट्रीय युद्ध परिस्थितीमुळे गॅस तुटवड्याची चर्चा असताना, दिवा शहरातील काही गॅस एजन्सींकडून नागरिकांची उघडपणे लूट सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. विशेषतः भारत गॅस कंपनीशी संबंधित काही एजन्सींविरोधात मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. या गंभीर प्रकाराची दखल घेत दिव्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने प्रशासनासमोर पुढील मागण्या केल्या आहेत.

१. संबंधित गॅस एजन्सींवर तात्काळ चौकशी कराव

२. दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत

३. गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणून नागरिकांना वेळेत सिलेंडर उपलब्ध करून द्यावा.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

मनसेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्य निवेदनात संबंधित एजन्सींवर चौकशी करून कठोन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच काळाबाजार करणाऱ्या एजन्सींवर तातडीने कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी मनसे, दिवा शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे यांनी ठाणे जिल्हा अधिकारी यांना पत्र लिहून तक्रार केली आहे. दिवा शहरातील नागरिकांच्या या गंभीर समस्येकडे प्रशासनाने त्वरीत लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी मनसेने केली आहे.

## २० वर्षांनंतर पुन्हा भरली 'ती' शाळा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** वीज केंद्रच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००६ च्या १० वी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २० वर्षांनंतर स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक २८ मार्च २०२६ रोजी आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या जुन्या आठवणींनी शाळा भारावून गेली. या स्नेहसंमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर दीव-दमन, मध्यप्रदेश, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहार अशा विविध राज्यांतून माजी विद्यार्थी आपल्या जोडीदारांसह व मुलांसह स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका विणा पांडे होत्या. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक दीपक निगोटे, पर्यवेक्षक वसंत त्रिपाठी, क्रीडा शिक्षक विपीन शर्मा, सहाय्यक शिक्षिका पद्मा दादूरे, रेखा भुजाडे, सुनंदा भोगे, सहाय्यक शिक्षक एस.जी.रामटेके यांच्यासह प्राध्यापक संगीता ठाकरे, राजेंद्र गूळरांधे, सहायक शिक्षक नरेंद्र बुटोलिया, चंद्रकांत मोहड, दिलदार रामटेके, प्रमोद इंगळे, अनिल भास्कर, नीरज मिश्रा, पुष्पा बढिये, गीता जालंदर, जिजा जैन, मनीषा नखाते, प्रकाश तवले आदि मंचावर उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

याप्रसंगी २० वर्षांनंतर आपल्या विद्यार्थ्यांना भेटून मोठ्या पदांवर कार्यरत व सुखी संसार करताना पाहून शिक्षकांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू आले होते. या प्रसंगी विद्यालया तर्फे माजी विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्प देऊन करण्यात आले. स्नेहसंमेलन कार्यक्रमा दरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबाला शिकत असलेल्या वर्गखोल्या दाखविल्या, शिवाय खेळाचे मैदान दाखविले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक विपीन शर्मा याना उद्देशून शर्मा सर आज आप एक बार पिटी लो असे म्हटल्यांवर पुन्हा एकदा विद्यार्थी लहान झाल्या




सारखे दिसत होते.कार्यक्रमा दरम्यान शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत गाण्यांच्या तालावर ठेका धरला होता त्यामूळे वातावरणात चैतन्य पसरले होते.

यावेळी मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी माजी विद्यार्थ्यांना उद्देशून शाळा ही केवळ इमारत नसते, तर ती संस्कारांची खाण असते आज २० वर्षांनंतर तुम्ही ज्या कृतज्ञतेने पुन्हा शाळेत आलात हेच या शाळेचे यश आहे. आयुष्यात कितीही मोठे झालात तरी आपल्या मुळांना आणि मातीला विसरू नका तुमच्या यशामध्ये तुमच्या शिक्षकांचे आशीर्वाद नेहमीच राहतील जे तुम्हाला शाळेने संस्कार दिले आहेत तेच संस्कार तुमच्या मुलांना द्या असे सांगितले याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षकासह वर्तमान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.स्नेहसंमेलनासाठी मनीष बत्रा आणि मोहन थापा यांचा मोलाचा वाटा होता २००६ च्या बॅचमधील सर्व विद्यार्थिनींचा जिद्दीने शोध घेतला व त्यांना स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी आमंत्रित केले. स्नेहसंमेलन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनीष बत्रा, मोहन थापा यांच्यासह निलेश डेअरिया, अर्पिता पांडे, अजमेरून खान, रेखा कश्यप, पिंकी अग्रवाल, टिपू अन्सारी, जयश्री बघेल, माधवी सिंग, नयना बोध, रुक्साना, विनोद नाईक, भावना शर्मा, ज्योती यादव आणि इतर सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## पेट्रोल आणि डिझेलवरील केंद्रीय उत्पादन शुल्कात १० रुपयांनी कपात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९ :** पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत वापरासाठीच्या पेट्रोल आणि डिझेलवरील केंद्रीय उत्पादन शुल्क प्रत्येकी ₹१० ने कमी करण्यात आले आहे. यामुळे ग्राहकांना भाववाढीपासून संरक्षण मिळेल. माननीय पंतप्रधान यांनी नेहमीच हे सुनिश्चित केले आहे की, नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यातील अनिश्चितता आणि किमतींपासून संरक्षण मिळावे.याव्यतिरिक्त, डिझेलच्या निर्यातीवर ₹२१.५ प्रति लिटर आणि एटीएफ (ATF) वर ₹२९.५ प्रति लिटर शुल्क आकारण्यात आले आहे.

यामुळे देशांतर्गत वापरासाठी या उत्पादनांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होईल. याबाबत संसदेला अधिसूचित करण्यात आले आहे. अशी दिलासादायत माहिती आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी द (एक्स) सोशल मिडिया प्लॅटफॉर्मद्वारे दिली आहे.केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करून तेल कंपन्या आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. वृत्तसंस्थांच्या माहितीनुसार, पेट्रोलवरील उत्पादन शुल्क, जे प्रति लिटर ₹१३ होते, ते आता ₹१० ने कमी करून ₹३ करण्यात आले आहे.

डिझेलवरील उत्पादन शुल्क, जे प्रति लिटर ₹१० होते, ते आता पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे, म्हणजेच शून्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे तेल कंपन्यांच्या नफ्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. दरम्यान, देशात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा तुटवडा असल्याच्या वृत्तांचे सरकारने आज खंडन केले. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटले आहे की, जगात काहीही झाले तरी भारताकडे ६० दिवसांसाठी पुरेसे पेट्रोल आणि डिझेल आहे.

# वाढवण बंदर परिसरात जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारणार

## राज्यातील १९० बाजार समित्यांमध्ये 'शेतकरी भवन'

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, शिर्डी (अहिल्यानगर) :** शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्याला सक्षम केल्यावरच राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल. याच दृष्टिकोनातून राज्यातील ३०६ पैकी जवळपास १९० कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त असे 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' उभारण्यात येत आहे. तसेच, शेतमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी वाढवण बंदर परिसरात तब्बल १२०० एकर जागेवर पॅरिसच्या धर्तीवर जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ उभारण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प शासनाने केला असल्याची माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज येथे दिली. कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनाचे भूमिपूजन व विविध विकासकाम ांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे



चेअरमन विवेक कोल्हे, कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संधान, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम आदी उपस्थित होते.

श्री.रावल म्हणाले, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांना शेतीसाठी मोफत वीज देण्याच्या उद्देशाने सौर कृषिपंप योजनेची प्रभावी अंम लबजावणी केली जात आहे. शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. नियमित कर्जफ ेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जात असून सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल हमीभावाने खरेदी करून शासनाने त्यांना मोठा दिलासा दिला आहे. यासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण' योजना प्रभावीपणे राबविली जात आहे. शेतीमालाच्या विक्रीत आधुनिकता आणण्यासाठी 'राष्ट्रीय कृषी बाजार' (ई-नाम) प्रणालीचा वापर वाढविला जात आहे. 'एक देश, एक बाजारपेठ' या संकल्पनेनुसार राज्यात 'एकत्रित परवाना' व्यवस्था लागू केली जात आहे, जेणेकरून राज्यातील कोणत्याही बाजार समितीतून शेतमालाची खरेदी करणे व्यापाऱ्यांना शक्य होईल. आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने २१०० कोटी रुपयांचा 'मॅग्नेट २.०' हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातून शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया, मालवाहतूक व साठवणूक प्रकल्पांसाठी विशेष अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे, असेही श्री. रावल यांनी सांगितले.

श्री. रावल पुढे म्हणाले , कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने विशेष कृती आराखडा तयार केला आहे. या अंतर्गत राज्यात 'कांदा महाबँक' उभारण्यात येणार असून समृद्धी महाम ार्गावर पाच ठिकाणी 'कांदा बँक' निर्माण केल्या जातील. या माध्यमातून कांद्याची साठवणूक, वर्गीकरण, वेष्टन व मूल्यवर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे. कांदा उत्पादकांना योग्य भाव मिळावा व त्यांचे नुकसान टळावे, यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीमार्फत तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत. कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने सहकार व विकासाचा मोठा वारसा अत्यंत चांगल्या पद्धतीने जपला आहे. बाजार समितीच्या वाढत्या उलाढालीची दखल घेत भविष्यात येथे शीतगृह, साठवणूक गोदामे व शेतमाल प्रतवारी यंत्रणा उभारण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य केले जाईल. भौगोलिक मानांकन प्राप्त शेतमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी परदेशांसोबत व्यापार करार केले जाणार आहेत. येथील शेतकरी भवनाचे काम लवकरच पूर्ण होईल व भविष्यातील सर्व योजनांमध्ये कोपरगाव बाजार समितीला प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.यावेळी स्नेहलता कोल्हे, बिपीन कोल्हे व विवेक कोल्हे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कोपरगाव बाजार समितीच्या शेतकरी भवनासाठी १ कोटी ७३ लाख रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिल्याचे साहेबराव रोहोम यांनी प्रास्ताविकात सांगितले.

# बल्लारपुरात विविध घटनेत २ व्यक्तींच्या आत्महत्या...

## एकाची धावत्या टँकर समोर तर दुसरा गळफास घेऊन आत्महत्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शहरातील कलाकेंद्र फोटो स्टुडिओसम ोर रविवारी दुपारी घडलेल्या धक्कादायक घटनेत एका अज्ञात युवकाचा धावत्या डिझेल टँकरसमोर येऊन मृत्यू झाला. ही घटना दुपारी सुमारे ३.५० वाजण्याच्या सुमारास घडली असून आत्महत्येचा संशय व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंदाजे ३५ वर्षीय युवक अचानक धावत येत भरधाव वेगात असलेल्या डिझेल टँकर क्रं. एमएच ३४ बीजी ६२६० समोर आला. चालकाला काही समजण्याआधीच टँकरची जोरदार धडक बसून युवकाचा जागीच मृत्यू झाला. सदर टँकर ताडली येथून डिझेल भरून राजुरा तालुक्यातील राम पूर येथील गौरव पेट्रोल पंपाकडे जात होता. टँकर चालक शेषराव बाजीराव कुळमेथे (वय ४७), रा. चीचाळा, ता. चंद्रपूर यांनी तत्काळ बल्लारपूर पोलीस स्टेशन येथे हजर होत घटनेची माहिती दिली. मृत युवकाची ओळख अद्याप पटलेली नसून तो शहरातील बांधकाम ावर काम करणारा मजूर असल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला असून ही घटना अपघात की आत्महत्या याबाबत पुढील तपास बल्लारपूर पोलीस सुरू आहे.

बल्लारपूर पोलीस स्टेशन हद्दीतील बामणी गावात एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास उघडकीस आली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, महादेव काशीनाथ तीतरे (वय ५१ वर्ष) यांनी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपविले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे पाठविण्यात आला. मृत व्यक्तीस दारूचे व्यसन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ गिराम व पोलीस अंमलदार महेश कुकुडकर करीत आहेत.

# पन्नास लाखांच्या खंडणीसाठी मंद्रूपच्या युवकाचे अपहरण

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२९, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील एका पंचवीस वर्षाच्या कॉन्ट्रॅक्टर युवकाला पैशाच्या कारणावरून पळवून नेऊन जीवे ठार मारण्याची धमकी देऊन त्यांच्या कुटुंबाकडे तब्बल पन्नास लाख रुपयांची खंडणी मागणी केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेतील तीन आरोपींना गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या सहा तासात मंद्रूपच्या सुपरफास्ट पोलीस अधिकाऱ्यांनी संबंधित खंडणीखोरांना कर्नाटकातील गुलबर्गा येथे ताब्यात घेतले आहे या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सुरज अर्जुन राठोड (वय २५.रा.मंद्रूप,ता.द.सोलापूर) असे अपहरण झालेल्या युवकाचे नाव आहे.

याबाबत माहिती अशी की सूरज राठोड हे आपले वडील अर्जुन राठोड,आई कमल राठोड, पत्नी निकिता आणि दोन मुलीसह र मंद्रूप येथे राहतात. सुरज हे जेसीबीच्या कामाचे कॉन्ट्रॅक्टचे काम करतात.२३ मार्च रोजी त्यांचे आई वडील पोहरादेवीच्या दर्शनासाठी नांदेडला गेले होते.

मंगळवारी २४ मार्च दुपारी तीन वाजता सूरज आपल्या पत्नी निकिता राठोड यांना मी विजापूरला जाऊन येतो असे सांगून आपल्या फोरचुनर कार (एम.एच.१८.बी.पी.१८५२) मधून निघून गेले. मात्र ते घरी परत आले नाहीत. गुरूवारी २६ मार्च रोजी सूरज राठोड यांनी आपले वडील अर्जुन राठोड यांना फोनवरून सांगितले की, मला काही लोकांनी पळवून नेले आहे आणि अपहरणकर्ते हे पन्नास लाख रुपयांची मागणी करीत आहेत.पन्नास लाख रुपये



द्यावे जर अपहरणाची माहिती पोलीसांना दिली तर मला ठार मारतील असे सांगितले. यावेळी सूरज हे आपल्या कुटुंबाच्या मोबाईलव्दारे संपर्कात होते. मात्र, अपहरणकर्त्यांनी त्यांना कुठे पळवून नेले आहे याची माहिती त्यांना मिळत नव्हती.शेवटी पत्नी निकिता यांनी आपल्या पतीच्या जीवितास धोका होऊ नये म्हणून शनिवारी दुपारी तीन वाजता या संदर्भात मंद्रूप पोलीस ठाण्यात अपहरणाची फिर्याद दाखल केली.

यावेळी घटनेचे गांभीर्य ओळखून मंद्रूपचे नूतन पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. त्यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे अवघ्या सहा तासात आरोपींचा शोध घेऊन या प्रकरणातील आरोपी गोपाळ मल्लाप्पा जवळगी( रा.वत्याळ,ता.सिंदगी,जि.विजयपूर) राघवेंद्र यल्लाप्पा जवरगीकर व भवानीराज अरविंद गोडबोले(दोघेही राहणार बसवनगर गुलबर्गा) असे तिघांना

कर्नाटकातील गुलबर्गा शहरात शिताफीने ताब्यात घेतले आहे. यावेळी कारवाईत पोलीस उपनिरीक्षक राज डांगे, सहाय्यक फौजदार परशुराम शिंदे,हवालदार सागर चव्हाण, संदीप काळे यांनी सहभाग घेतला होता.पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पटवारी हे करीत आहेत.

# जिंतूरमध्ये खोट्या सहीद्वारे फसवणूक; गुन्हा दाखल

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२९, जिंतूर :** जिंतूर पोलिस ठाण्यात खोट्या सहीच्या आधारे शाळेचे प्रवेश-निर्गम कागदपत्र तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी आज गुन्हा दाखल करण्यात आला असून, शहरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनोज शिवराज मुळे (वय ४०, व्यवसाय – मुख्याध्यापक) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित आरोपींनी खोटी सही करून प्रवेश-निर्गम (Admission Leaving Certificate) काढले, अशी गंभीर बाब समोर आली आहे.

या प्रकरणात आरोपी म्हणून, अब्दुल माजिद अब्दुल रहीम, अतीक रफीक पठाण यांची नावे समोर आली असून, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ अंतर्गत कलम ३१८(४) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

सदर घटना २ जानेवारी २०२६ ते ६ फ ेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेनंतर जिंतूर शहरात आणखी एक धक्कादायक प्रकार समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिंतूर येथील जवाहर शाळा येथेही अशाच प्रकारे खोट्या सहीच्या आधारे प्रवेश निर्गम व कागदपत्रे तयार केल्याचा आरोप होत असून, त्या प्रकरणातही लवकरच गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. खोट्या सही व बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई होणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### मोहर्ली वनपरिक्षेत्रांतर्गत वन्यजीवाची शिकार करुन अन्न प्राशन करणाऱ्या दोन व्यक्तीस अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** दिनांक २८ मार्च २०२६रोजी सकाळी अंदाजे ११.३०वाजताचे दरम्यान मोहर्ली वनपरिक्षेत्राअंतर्गत सितारामपेठ बिटातील मौजा भामडेळी येथील मच्छीघाट इरई धरण येथे आरोपी नामे श्रीमती ज्योती शैलेश घंटसाल, वय- ३५ वर्ष, रा.कैकलूरु, जिल्हा - क्रिष्णा (आंध्रप्रदेश) व त्यांचे पती नामे शैलेश सोमनाद्री घंटसाल वय- ३८ वर्ष रा. कैकलूरु, जिल्हा - क्रिष्णा (आंध्रप्रदेश) यांनी इंडियन फ्लॅप शेल टर्टलयाला पकडून भाजी शिजवून खात असतांना आढळून आल्याने वनरक्षक सुरेंद्र मंगाम व क्षेत्र सहाय्यक मोहर्ली संजय जुमडे यांनी वन गुन्हा क्रमांक ०९६४३/२४१०५६, दिनांक : २८/०३/२०२६ अन्वये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ९, ३९, ५१ अन्वये वन गुन्हा जारी केला.सदरचा तपास उपसंचालक (बफर) कुशाग्र पाठक यांच्या मार्गदर्शनात, वनपरिक्षेत्र अधिकारी मोहर्ली संतोष थिपे, पुढील तपास करीत आहे.

### युध्दाला नकार, शांततेला आकार; चंद्रपूरचा जागतिक विक्रम १३८१ विद्यार्थ्यांची मानवी साखळी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** शहरातील सोम य्या ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स व महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त पुढाकारातून जागतिक शांततेचा संदेश देणारा ऐतिहासिक विश्वविक्रम शनिवारी, दि.२८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता साकारण्यात आला. तब्बल १,३८१ विद्यार्थ्यांनी एकत्र येत शांततेचे प्रतीक असलेले'पीस साइन'उभे केले. याची दखल घेत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सनेमानवांच्या सहभागातून साकारलेले शांततेच्या चिन्हाचे जगातील सर्वात मोठे मानवी चित्रअसा अधिकृत विक्रम नोंदविला.

यापूर्वी हा विक्रम १,०७६ जणांच्या सहभागाने नोंदविण्यात आला होता. मात्र, चंद्रपूरातील या उपक्रमाने तो मोडीत काढत नवा इतिहास घडविला. चंद्रपूरच्या भूम ीतून'युद्ध नव्हे, शांती हवी'हा प्रभावी संदेश देण्यात आला. सध्या जगात इस्त्राईल-अमेरिका व इराणमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या शांततेच्या संदेशातून जगातील सुमारे १८० देशांपर्यंत मानवतेचा, ऐक्याचा आणि बंधुत्वाचा संदेश पोहोचला, अशी भावना संस्थेचे अध्यक्ष पी. एस. आंबटकर व उपाध्यक्ष पीयूष आंबटकर यांनी व्यक्त केली.या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणून माजी मंत्री व आ.सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. विशेष म्हणजे, याच संस्थेने १ मार्च रोजी सात मिनिटांत २० लावण्या सादर करण्याचा आणखी एक विश्वविक्रम नोंदवून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या उपक्रमामुळे चंद्रपूरचे नाव जागतिक पातळीवर झळकले असून, शिक्षणासोबत सामाजिक जाणीव जोपासणाऱ्या सोमय्या ग्रूपच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### आपधूप येथे यात्रा उत्सवाला सुरुवात




**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** पुणे महामार्ग वरील पारनेर तालुक्यातील सुपा येथून तीन किमी अंतरावर वरती आपधूप गाव असून श्री क्षेत्र खंडेश्वर देवस्थान चैत्र पौर्णिमा यात्रा उत्सव साजरा होत असून नवसाला पावणारे कुलदैवत असून कुलदैवताची लोके मनोभावी पूजाअर्चा करतात खंडेराया हे पालीचे मूळ ठाण असून हे नवसाला पावणारे खंडेरायाचे ठाण असून यात्रा उत्सवाची पूर्ण तयारी झाली असे आपधूप गावचे सुपुत्र उद्योजक सुरेश शेठ धोंडीबा गवळी साहेब यांनी दिली आहे. आपधूप येथील ३०० वर्षाची परंपरा असलेल्या खंडेरायाचा यात्रा उत्सव चैत्र पौर्णिमेला होतो.

या उत्साहात पारनेर सह महाराष्ट्रातील लाखो भावी भक्त सहभागी होतात. यात्रेच्या दिवशी पहाटे देवाचा अभिषेक केला जातो त्यानंतर नवीन वस्त्र अलंकाराने देवाला मडवले जाते पहाटे महारती होऊन यात्रा उसात प्रारंभ होतो. दिवसभर भाविकांची दर्शनासाठी रीड लागलेली असते. भाविक भंडारा खोबऱ्याची उधळण करतात रात्री बारा बारा वाजता विज्ञानाला आव्हान देणारा १२ गाड्याचा कार्यक्रम होतो असे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किसन साहेबराव गवळी यांनी सांगितले असून त्यानंतर शोभेची दारूची मोठ्या प्रमाणात आकाशबाजी केली जाते व भव्य छबिना निघतो असे विश्व हिंदू परिषदेचे पारनेर तालुका अध्यक्ष देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष संतोष भगवंत गवळी यांनी सांगितले असून मंदिर डेकोरेशन व विद्युत रोषणाई झाल्याचे श्रीक्षेत्र खंडेश्वर देवस्थानचे सचिव अशोक संपत गवळी यांनी सांगितले असून दुसऱ्या दिवशी कुस्त्याचा जंगी हंगामा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले आहे आत्तापर्यंत गावाची श्रद्धा जपत विज्ञानाला आव्हान देणारा बारा गाड्या श्रीक्षेत्र खंडेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त विजय श्रीधर सोनवणे रेवजी बबन गवळी शरद पोपट गवळी अनिल बाबुराव गवळी किसन भगवंत गवळी बाळू गणपत गवळी आप्पा धोंडीबा गवळी मेजर कचरू काशीराम गवळी रभाजी कान्हू खोसे संपत मल्हारी गवळी प्रशांत पोपट गवळी यांनी देवस्थान ट्रस्ट कडे बैलगाडी भेट दिली असून यात्रेनिमित्त लाखो भाविक दर्शनासाठी येणार असल्याचा अंदाज असल्याने त्यादृष्टीने देवस्थान ट्रस्टने जयंत तयारी केली असल्याची माहिती श्री क्षेत्र खंडेश्वर देवस्थान पदाधिकारी आणि विश्वस्तांनी दिली असून चैत्र पौर्णिमा यात्रा उत्सव गुरुवार दिनांक ०२-०४-२०२६ रोजी मोठ्या थाटामाटात होणार असल्याचे सांगितले आहे. हे नवसाला पावणारा कुलदैवत आहे